रा. शं. दातार नाट्य पुरस्कार :
आनंदभोग मॉल

मनोगत । आशुतोष पोतदार

# चिकित्सक आकलन करून घेण्याची इच्छा आहे!



माणूस कितीही आधुनिक झाला, प्रागतिक झाला, सुसंस्कृत झाला, सुशिक्षित झाला तरी त्याच्या मनातली जात, जाता जात नाही. या नाटकाचा हा आशय केवळ जातीपुरताच मर्यादित राहत नाही, तर आजच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक पर्यावरणाशी तो नातं जोडतो आणि आधुनिक माणसाचा, जगाचा एक सर्वसमावेशक छेद अत्यंत तरलतेनं, सूचकतेनं आणि नाट्यपूर्ण रीतीनं प्रकट करतो.

पारंपरिकता आणि आधुनिकता यांच्या व्यामिश्रतेत धडपडणारा माणूस इथं प्रत्ययाला येतो. मिळणाऱ्या संधीचा फायदा घेऊन पुढे जाणारा ब्राह्मणेतर वर्ग, दुखावलेला ब्राह्मण वर्ग, जागतिकीकरणाचा रेटा, वेगवेगळ्या प्रकारच्या प्रदूषणांत प्रत्येक मूल्याशी करावी लागणारी तडजोड आणि अस्तित्वासाठी करावी लागणारी धडपड या सर्वांतून मार्ग काढायला नायकनायिकेला हवाय फक्त चकचकाटानं दिपवणारा मॉल.

गुरुवारच्या भजनाची वेळ होते. भजनाच्या दुकानात आजोबा, गुरुवय्या स्वामी, देवाप्पा नायकवडी, बसगोंडा पाटील, पांडबा हेगडे टाळ सोडवत, तबला लावून आणि पेटी धरत सूर लावतात. आजोबांनी किराणा मालाचं दुकान सुरू केलं पण खादी चळवळ आणि विठ्ठलाच्या नादानं धंदा करायला जमला नाही. म्हणून दुकानाच्या जागी भजन थाटलं तेव्हापासून त्याला भजनाचं दुकान म्हणतात. तर, वीणा घेऊन मी मधे बसलोय आणि पंचपदी संपायला यायची वाट बघतोय. तेवढ्यात, म्हमूलाल सांगावकर नेहमीसारखे वाऱ्याच्या लकेरीसारखे येतात. तबल्यावर बसतात. सगळे हरकलेत कारण म्हमूलाल सांगावकरांची जादूई बोटे. पंचपदी संपायची ती विठ्ठोबा-रखुमाईच्या गजराने. विठोबाच्या गजराला तबल्याचा ठेका माझ्यासाठी ॲडजस्ट करायचा नित्याचा भाग, कारण मी नाचणार असतो. म्हमूलाल माझ्यासाठी नजाकतीचे बोल सादर करतात, कारण दमवेपर्यंत मला नाचवायचे हा त्यांचा अजेंडा! आज नेहमीपेक्षा झोकात नाचला म्हणून सगळ्यांचा जास्ती चहा प्यायचा मला आग्रह. बाळाबाई तिचा गोड चहा आणून देते. आठवड्यात मला एकदाच मिळणारा चहा मी पितो. दरम्यान, सगळे दिवसभरातल्या तक्रारी, आपापले उद्योग एकमेकांना सांगतात. बसगोंडा पाटलांचे चहा पिऊन होते. ते मला खांद्यावर घेऊन घराकडे सोडतात. मी अर्धामुर्धा झोपलेला.

नाटक नावाच्या परफॉर्मिंग आर्टसाठीचं हे माझं पहिलंवहिलं एक्स्पोझर. भरभरून संवाद साधणारं. असं काही मला लिहिता येईल काय? स्पेसचं असं डायनॅमिक माझ्या नाटकातून मला उभं करता येईल काय? हे माझ्यासाठी नेहमीचे मुद्दे राहिले आहेत. मला वाटतं की नाटक हे माध्यम अवकाशाच्या अशा मुद्यासाठी व्हलनेरबल असतं. रूपातच ते लपलंय - अंगभूत असावं - कारण त्याचा लाइव्हलीनेस, त्याचं 'मधले'पण. म्हटलं तर एका बाजूला ते आत्यंतिक व्यक्तिगत असतं. दिवसभर राबणाऱ्या बाळाबाईला चहासाठी उशीरपर्यंत ताटकळत बसावं लागायचं. शिवाय, मोजक्या पैशात दूध आणि साखरेसाठी चिडचिड व्हायची ती निराळीच. भरीत भर कसला 'च्या' करतीस म्हणून भजनकरी बापयं नाकं मोडायचे ते वेगळंच. दुसऱ्याच क्षणी, 'मी असण्या'ची सारी चिलखतं फेकून लोकांना सामोरं जाण्याची सामूहिकता परफॉर्मन्समधे असते जी मला भजनाच्या अवकाशाने पयल्यांदा दाखविली. अगणित शक्यता निर्माण करत लोकावकाशात रममाण होणारे आणि वेळप्रसंगी आव्हान देणारे नाटकाचे 'मधले'पण मला भावते. आणि तसे नाटक लिहिण्याची आकांक्षा मी बाळगून असतो.

नाटक लिहिणे - एखादी कविता लिहिणे वा भाषांतर करणे म्हणजे स्वत:कडे आणि भवतालाकडे, लोकावकाशाकडे पहाण्याची नामी संधी असते. लिहिताना पाहाण्याची दृष्टी मिळते. नाटक लिहून होते आणि सतर्क समाज ते रंगमंचावर पाहू लागतो तेव्हा ती दृष्टी विकसित होत जाते. पण, लिहिण्याच्या आधी आपण 'बघण्या'ची दृष्टी घडवत असतो. आपण काय वाचतो, कुठे राहतो, आपला इतिहास काय, त्या इतिहासाकडे आपण कसे बघतो या सगळ्यांतून आपले 'बघणे' घडत असते.

'आनंदभोग मॉल' लिहिताना कोल्हापूर आणि भवतालाने दिलेल्या दृष्टीतून स्वत:कडे आणि भवतालाकडे बघू शकलो. 'बघणे' निव्वळ भौगोलिक नव्हते. ते, नाटक लिहिताना, माझ्या ओळखीशी निगडित होते. प्रकटीकरणाच्या अनेक शक्यता सांगाव आणि कोल्हापूरने दिल्या. गावे आणि गावांचे 'असणे'पण मला भावनिक पाठबळ देतात. ऊर्जेला बळ देतात. इंपल्सेसना जागरूक करतात. एका क्षणी नाटकाच्या रचनेचे, रूपाचे आणि आशयाचे भान देतात. या अर्थाने लिहिणे हा कोरडा व्यवहार नसतो - फॉर्म शोधण्याचा किंवा आशयाने भरण्याचा. या संदर्भात भावना आणि विचार यांची रूढार्थाने केलेली विभागणी आपल्याला मान्य करता येत नाही. आशय आणि रूप असेच आपल्या ओळखीचे भाग असतात - एकत्रितपणे. पात्रे, त्यांचे विचार - रूप, रूपाचे भान आणि त्याची रचना निर्मितिप्रक्रियेत सहज मिसळलेले असतात. लेखक म्हणून आपण त्यात सामील होतो आणि लांबवर पण उभे असतो. दसरा चौकात उभारल्याप्रमाणे.

कोल्हापूरचा दसरा चौक मला सामील होणे, तटस्थ राहणे, चिकित्सा करणे, समर्थन करणे अशा वेगवेगळ्या बाबींचा मेळ घडवणारा अवकाश वाटतो. सरंजामी व्यवस्था, पारंपरिक विचारचौकटी, अधलीमधली आधुनिकता आणि त्याचबरोबरीने प्रस्थापित ज्ञानव्यवस्थेला हालवत नवपरिवर्तनाला दिशा देणाऱ्या यंत्रणा इथे एकसाथ सतर्क असतात. सांगावतून शिकायला येताना रस्ता इथे थांबायचा आणि मग, तिथून पुढे गावाच्या संदर्भात 'आधुनिक' वाटणारे रस्ते भेटायचे. सरंजामी चौकट आणि जातव्यवस्था भक्कम ठेवत 'आधुनिक'तेकडे आणि 'प्रगती'कडे वाटचाल करणाऱ्या बदलातील कोल्हापूरसारखी गोलबल शहरे 'ना इधरका ना उधरका' अशा अवस्थेत लटकलेली. 'शिवाजी आमचा आणि शिवाजी तुमचा' अशी द्विध्रुवात्म मांडणी अशाच गोलबल जगातल्या राजकारणाचा परिपाक. भांडारकर आणि जेम्स लेन प्रकरणानंतर द्विध्रुवात्म ओळखी आणि त्यामागच्या अस्मितांचे राजकारण अधिकाधिक मजबूत होत आहे. ओळख आणि अस्मिता यांच्या जोरावरचे ताणेबाणे आणि राजकारण आपली विविध रूपे दाखविताना गोविंद पानसरेंनी लिहिलेल्या

'शिवाजी कोण होता?' या पुस्तिकेच्या निमित्ताने 'दसरा चौक परंपरे'ला व्यापक भान दिले. इथे, मुद्दा फक्त पुस्तिकेचा नाही तर 'शिवाजी कोण होता चळवळी'ने द्विध्रुवात्म चौकटी मोडून समाजाला मूलगामी जीवनदृष्टी देण्याचा भाग आहे. एका टप्प्यावर मी जाँ जने या फ्रेंच नाटककाराचे 'द मेडस्' हे नाटक रूपांतरित केले, त्या वेळेस लक्ष्मी आणि भारती या कामवाल्या बाया आपल्या कोल्हापुरी भाषेत स्त्री-पुरुष, शोषित-शोषक यांच्यातल्या सत्ताकारणाची आणि उतरंडीची चौकट मोडताना दिसल्या. दारिओ फो चा 'आई-दहशतवाद्याची' हा नाट्यांक हुकूमशाही मूलतत्त्ववाद्यांविरुद्ध आवाज उठवत राहिला. ऑगस्ट स्टिंडबर्गचे 'मिस ज्युलि' भाषांतरित करताना शोषितांकडे अभिनव नाट्यशैलीतून पाहणे आले. हे सारे प्रयत्न 'शिवाजी कोण होता चळवळी'ने दिलेल्या व्यापक भानाचा परिपाक असावे असे वाटते.

'आनंदभोग मॉल' लिहिताना 'गोल्बल' जगातील मानवी नात्यांचे व्यवहार - त्यांच्यातले ताणेबाणे आणि राजकारण कोणकोणत्या पातळ्यांवर पोहोचले आहेत हे पाहाण्याचा नाटकीय प्रयत्न होता. भांडारकर संशोधन संस्था प्रकरणानंतर गोल्बल जगात त्याचे काय पडसाद पडले? या ताण्या-बाण्यांत अत्यंत व्यक्तिगत पातळीवर स्त्री-पुरुष काय भूमिका वठवत होते? शारीरसंबंधाच्या क्षणी स्त्री-पुरुषांची शरीरे ऐन मोक्याच्या घडीला जातिभेदाच्या मुद्यांना काय आणि कशी प्रतिक्रिया देतात? खेड्यापाड्यांतून स्थलांतरित होणारा मानवी समुदाय 'आधुनिकी'करणात सहभागी होताना मॉल्स् आणि हायवेच्या रूपातून 'प्रगत'होण्याची रमणीय स्वप्ने पाहातो, त्या वेळेस बिन-जातीची/बिन-उतरंडीची व्यवस्था निर्माण होते काय? की, आणखी एका नव्या उतरंडीची भर पडते? अशा प्रश्नांना भिडत मी 'आनंदभोग मॉल' हे नाटक लिहिले.

'प्रश्नांना भिडत' याचा अर्थ उत्तर शोधण्यासाठी नाटक असा मी धरत नाही. निष्कर्ष काढण्यासाठी कलारूप मानून कलेला अप्लाईड करून मी मर्यादित करू इच्छित नाही. यापेक्षा, इतिहास आणि समकालीन जगण्याचे आकलन आणि कलारूपाचा शोध घेणे, या भूमिकेतून मी नाटकाकडे पाहातो. लोकावकाशातील गुंत्यांना थेट आणि लाइवली भिडण्यासाठी नाटक या रूपाची निवड हीच एक भूमिका असते. चिकित्सक आकलनाच्या प्रक्रियेतील सतत बोलणारी, सतत वसवस करणारी, सतत उणे-दुणे काढणारी आणि पापुद्रे काढणारी माझी पात्रे मला अस्वस्थ करत राहिली. ती अस्वस्थता माझा मित्र अतुल पेठेला पाच वर्षांपूर्वी जाणवली होती. निर्मितीच्या एका टप्प्यावर महेश एलकुंचवारांनी नाटकातल्या सब-टेक्स्टवर विचार करण्यास मला अधिक प्रवृत्त केले. शेवटी, 'आसक्त'च्या मोहित टाकळकर या माझ्या नाटकाच्या दिग्दर्शकाला आणि समकालीन मित्राला हे सगळे दिसले नसते तर नाटक सतर्क समाजापर्यंत पोहोचले नसते. गिरीश कुलकर्णी हा माझा जवळचा मित्र आणि अनिता दाते (मी लिहिलेल्या आधीच्या नाटकाची दिग्दर्शिका) मोहितला काय पोहोचवायचे आहे ते प्रभावीपणे आपल्या रंगभाषेतून पोहोचवतात.

नाटकानंतरचे नाटकही तेवढेच नाटकीय असते. एका विशिष्ट टप्प्यावर लिहिलेले नाटक माझ्यासाठी 'मागे' पडते. भवताल बदलत जातो. आपण बदलत असतो. नवे पेच आणि नव्या मांडणीचे वेगवेगळे मार्ग सापडत राहतात. आताशा, मला भारतातील आणि कधी कधी भारताबाहेरची नाटके बघायला मिळतात. कधी-कधी नाटक नको वाटावं इतकं नाटक होतं. शिवाय, इतर कलारूपंही खुणावत राहातात. या अर्थाने, व्यक्त होण्यासाठी रूपाच्या शिस्तीचे बंधन नको वाटते. मग, म्हमुलाल सांगावकरांना कंटेम्परारी कोरिओग्राफीमधल्या आस्ताद देबूंशी जोडू पहातो. तर, कधी, जर्मनीतला डफवाला मोहम्मद पिराजी सरनाईकांसाठी डफ वाजवतोय असं वाटतं. बारीक-बारीक तुकड्यांत विखुरतोय आपण. समकालीन नातेसंबंध आणि समाजाच्या अंतर्रचना बदलतायत. बहुविध दृष्टिकोन, भाषा आणि जीवनशैली आकाराला येतायत. या पार्श्वभूमीवर, 'शेअर' करता येईल अशा लोकावकाशात नाटक कसे नेता येईल? त्यासाठी त्याचे रूप कसे असेल? फेसबुक वा एसएमएस् किंवा ग्रामपंचायती आणि लोकसभा यांसारख्या नव्या 'परफॉर्मिंग अव्हेन्यूज'च्या संदर्भात मी कसले नाटक लिहायचे? 'बिग बॉस' चवीने पाहात बसलेल्या घरापर्यंत किंवा बारडीभर पाण्यासाठी सकाळपासून रांगेत ताटकळत उभारलेल्यांपर्यंत माझे म्हणणे पोहोचेल काय? की, नाटकाची आवाहकता दोन-चार लहान-मोठ्या शहरांतील छोटेखानी बंदिस्त नाट्यगृहातील मोजक्या प्रेक्षकांपुरती राहील? पण, भोवतालच्या आकलनाचे कोणते नाटकीय रूप आकाराला येईल? असे आणि असे इतर प्रश्न माझ्यासमोर उभे राहत असतात. या प्रश्नांचे चिकित्सक आकलन करून घेण्याची माझी इच्छा आहे आणि त्यासाठी 'महाराष्ट्र फाउंडेशन'चा पुरस्कार मला बळ देईल असा विचार मी करतो.


- आशुतोष पोतदार

७०६-सी, सम्राट कॉलनी,

आयसोलेशन हॉस्पिटल रोड,

कोल्हापूर ४१६०१२.

Mob. 09342835358

potdar.ashutosh@gmail.com

ओळख । रफीक सूरज

# तथाकथित प्रगतीच्या टप्प्यावरील नव्या उतरंडीची गुंतागुंत

आशुतोष पोतदार हा आमच्या पिढीचा प्रतिनिधी. गेल्या दीड-दोन दशकात लिहिते झालेल्या आणि लेखनाविषयी गंभीर आस्था असलेल्यांपैकी एक ठळक नाव. नाटक-एकांकिका, कविता, कथा अशा अनेक प्रकारांत त्याने साहित्यनिर्मितीचा प्रयत्न केला आहे. आशुतोषचं आतापर्यंत फक्त एकच पुस्तक प्रकाशित झालेलं आहे. फ्रेंच नाटककार जाँ जने याच्या 'द मेडस्' या नाटकाचं 'कामवाल्या बाया' या नावाने मराठी रूपांतर ही त्याच्या नावावरील ग्रंथबद्ध असलेली एकमेव नोंद. आम्ही मित्रांनीच पुढाकार घेऊन, जुळवाजुळव करून हे पुस्तक छापलं. खरं तर हे नाटक नामांकित प्रकाशकाकडून छापलं जाणं आवश्यक होतं. त्यामुळे अनेकांपर्यंत हे नाटक पोचलं असतं आणि आशुतोषने घेतलेल्या मेहनतीचं खऱ्या अर्थानं चीज झालं असतं. 'बडा प्रकाशक' गाठण्यातल्या खटपटी वगैरे गोष्टींवर स्वतंत्रपणे लिहिता येईल. त्याचा पाल्हाळ लावण्याची इथे गरज नाही. फक्त अशा खटपटी करण्यात आशुतोषला उत्साह नाही, तो त्याचा स्वभाव नाही. अनाठायी प्रसिद्धीच्या मागे लागण्यात वेळ दवडण्यापेक्षा आपण आपल्या आवडीचे काम प्रामाणिकपणे करीत राहावं अशी त्याची साधी सोपी सरळ भूमिका आहे.

'प्लाटफॉर्म', 'सुख', 'शेतकरी डॉट कॉम' या एकांकिकांबरोबरच काही पथनाट्यांचं लेखन आशुतोषने केलं आहे. अगुस्त, स्तीन्दबर्ग, दरिओ फो अशा लेखकांची 'आई दहशतवाद्याची', 'मिस जुली' ही रूपांतरं मराठीत करून त्याने खूप मोलाचं काम करून ठेवलं आहे. अलीकडेच 'ऐवजी'च्या एका अंकात त्याच्या एकदम आठ कविता छापून आल्या. कवितेचं एक नवं, प्रसन्न रूप समोर आलं. ही कविता शहरी जीवनातील अनुभव, जाणिवा आणि संवेदनशीलता प्रकट करणारी असली तरी ती तिथेच थांबत नाही. तर मानवाच्या मूलभूत शोकात्म परिस्थितीचा आणि नियतीचा ती शोध घेते. अपरिचित अशा अनुभवविश्वाच्या गाभ्याला स्पर्श करण्यासाठी कवितेची नवी भाषाच प्रकट होत जाते.

*'बच्छड्यांनो - आठवतात तुमचे चेहरे।*
*शेंगदाणे ठेवलेले डोळे।*
*फुलांच्या परड्या रिकाम्या व्हाव्यात।*
*तसे लवंडता अंगावर।*
*आईस्क्रीम पसरावे तसे पसरता अंगभर।*
*मग, इथल्या खिडक्यांनाही जाग येते'*
*(या शहरातल्या घराच्या उंबरठ्यावरून)*

अशा साध्यासोप्या रचनेतून भाषेवरची विलक्षण पकड प्रत्ययाला येते. हा लेखक मुळात कविप्रकृतीचाच आहे आणि त्याचं कवितालेखन अव्याहत चालू राहणं आवश्यक आहे, असंच सतत जाणवत राहतं. याशिवाय, आशुतोषने मराठी आणि इंग्रजीतून काही प्रमाणात समीक्षाही लिहिली आहे. गंभीर प्रवृत्तीचा लेखक लेखनातून आपल्या काळाविषयी बोलत असतो. एक प्रकारे सामाजिक पर्यावरणातील आपलं संवेदनशील अस्तित्व तो या निमित्ताने अधोरेखित करत असतो. आशुतोषने करून ठेवलेलं सर्व लेखन या बाजूने विचारात घेतलं तर नाटक, कथा, कविता असे अभिव्यक्तीचे वेगवेगळे प्रकार हाताळून स्वतःचे संवेदनशील अस्तित्व प्रकट करण्यातील त्याची प्रामाणिक धडपड सुस्पष्ट व्हावी. ('परिवर्तनाचा वाटसरू'च्या २००८च्या दिवाळी अंकात 'आशुतोष की अल्टरनेटिव्ह आँखियोसे'... या शीर्षकाखाली आशुतोषने देशाच्या विविध भागांत फिरून टिपलेल्या तेथील आम जनजीवनाच्या छायाचित्रांची मालिकाच प्रसिद्ध झाली आहे! अभिव्यक्तीच्या या नव्या डायमेंशनची या ठिकाणी नोंद घेणं आवश्यक वाटतं.)

'आनंदभोग मॉल' हे आशुतोषचं पहिलंच स्वतंत्र संपूर्ण नाटक. वर्तमानाला प्रतिक्रिया कशी द्यायची हा पेच या नाटकाच्या केंद्रस्थानी आहे. आजच्या कालखंडावर जागतिकीकरणाची एक दाट छाया पसरलेली आहे. नव्या सांस्कृतिक वसाहतवादाने गेल्या काही वर्षांत प्रत्येकाच्या

'जीवनशैली'मध्ये झपाट्याने बदल होत आहेत. खूप मोठा सांस्कृतिक संघर्ष आणि अभिसरण साऱ्या जगभर सुरू आहे. एका बाजूला मार्केट इकॉनॉमीच्या प्रलोभनांचा प्रचंड ताण शहरी मध्यमवर्गावर पडतोय; तर दुसऱ्या बाजूला खेड्यातील जगण्याचे संदर्भ बदलत गेले आहेत. शॉपिंग मॉल्स, हेल्थ क्लब्स, मल्टिप्लेक्स, सौंदर्य प्रसाधनं, मोबाईल्स, इंटरनेट अशा अनेक गोष्टींची संख्या वाढू लागली आहे. मध्यमवर्गास या गोष्टींचं अप्रूप वाटतं आहे. अशा गोष्टी जीवनावश्यकच आहेत असं पटवून देणारी समांतर व्यवस्थाही उभी राहते आहे. औद्योगिकीकरणात उपजीविकेचं साधन शोधण्यासाठी लोक खेडी सोडून शहराकडे पळत सुटले होते. शहरांचं खूप मोठे आकर्षण वाटत होतं. पण जागतिकीकरणात ही प्रक्रिया उलट बाजूने होते आहे. शहरेच एक एक करीत खेड्यांना गिळंकृत करीत सुटली आहेत. शहर आणि खेडी यांतील सीमारेषा धूसर होत चालली आहे. अशा या जोरदार घुसळणीतून कदाचित शतकानुशतकं घट्ट रुजून राहिलेली जातीयता पूर्णपणे नाहीशी होईल असं वाटत होतं. पण प्रत्यक्षात वेगळंच चित्र समोर येतं आहे. प्रत्येकाच्या हाडीमांसी खिळलेली जातीयता अधिकच प्रखर होत चाललीय. 'आनंदभोग मॉल' या नाटकात आजच्या या वास्तवाचा अनेक बाजूंनी विचार मांडला आहे.

या नाटकात दोनच पात्रं आहेत. नवरा आणि बायको. डॉ. आनंद पाटील हा पेशाने डॉक्टर असलेला शहाण्णवकुळी मराठा तर त्याची जातीने ब्राह्मण व पेशाने प्राध्यापिका असलेली बायको. दोन्ही व्यक्तिरेखा उच्चविद्याविभूषित आणि मध्यमवर्गाच्या प्रतिनिधित्व करणाऱ्या. नवरा आणि बायकोची जात भिन्न भिन्न आहे. या दोन्ही जातींना समाजव्यवस्थेत राजकीय आणि सामाजिक सत्तास्थान उपभोगण्याची संधी मिळालेली आहे. वर्चस्वाचा सुप्त अहंकार या दोन्ही पात्रांत पुरेपूर भिनलेला आहे. अधिक वरचा आर्थिक स्तर गाठण्याची नवराबायकोची पुरेपूर धडपड सुरू आहे. बाहेर स्पर्धेचं युग आहे, त्यामुळे मिळालेल्या छोट्याशा संधीचंही सोनं केलं तरच आपला टिकाव लागणार आहे याचीही त्यांना जाणीव आहे. कोणत्याही थराला जाण्याची आणि वाट्टेल ती तडजोड करण्याची त्यांनी मानसिक तयारी केली आहे. पण या स्पर्धेत टिकण्याच्या धडपडीत त्यांना स्वतःकडे मात्र नीट 'कॉन्सन्ट्रेशन' करता येत नाही. अगदी त्यांची 'सेक्स संबंध' ठेवण्यातील मजा हरवून गेली आहे. मोबाईल स्क्रीनवर मल्लिका शेरावत सारख्या उत्तान फिल्मी नायिकांना बघून उद्दीपित होण्याचा केविलवाणा प्रयत्न नवरा करतो आहे. निकोप शारीरिक संबंधांअभावी मूल होत नसल्याने दोघेही चिंतातुर झाले आहेत. कुण्या मॉंदेवीच्या नामाचा मंत्रोच्चार, बीजफलनाचा सुयोग्य मुहूर्त साधण्यासाठी चिनी कॅलेंडरचा वापर असेही यांचे उद्योग चालले आहेत. सेक्स रिलेशनमध्ये दुर्बल ठरलेल्या नवऱ्याची 'फोर्स जमा झाल्यावर करायचं' ही अगतिकतेतून आलेली प्रतिक्रिया अत्यंत बोलकी अशी आहे. ऐहिक सुखाच्या धडपडीत आतील 'ओरिजनल फोर्स' हरवून बसलेले हे नवराबायको बाहेरून उसना फोर्स मिळविण्याच्या खटपटीत आहेत.

दोघेही नवराबायको बाहेर समाजात वावरताना आधुनिक इमेज सांभाळत असले तरी आतल्या आत स्वजातीचा सुप्त अहंकार त्यांना टाकून देता आलेला नाही. संधी मिळताच हा अहंकार बाहेर फणकाऱ्याने पडतो. आंतरजातीय लग्न करून जणू आपण जोडलेल्या जातीवर उपकारच केलेत असा पलटवार करायला दोघेजण मागेपुढे बघत नाहीत. वैयक्तिक फायदे उपटताना मात्र जातीचा अभिमान गळून पडतो. एका अमेरिकन संस्थेचं अनुदान पदरात टाकून घेण्यासाठी आनंद पाटील संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसमोर लाळघोटेपणा करतो. 'ख्रिस्तीयन' आणि 'क्षत्रिय मराठा' यांतील इंग्रजी उच्चार साधर्म्य लक्षात आणून देत 'आम्ही तुमचेच कसे' असं जोडून घेताना त्याला कुठेही अपराधीपणा वाटत नाही. तर दुसऱ्या बाजूला 'मराठा' शिक्षणसंस्थेत नोकरी मिळविण्यासाठी 'मी तुमच्यातली' असं त्याची बायकोही सोयीनुसार 'जात' वापरते. गैरसोयीच्या ठिकाणी जातीचा अभिमान बाजूला ठेवण्याचं व्यावहारिक चातुर्य दोघेही दाखवतात.

'आनंदभोग मॉल' या नाटकाला आणखी एक केंद्र आहे ते म्हणजे पुरुषप्रधान मानसिकतेचं दर्शन. नाटकाचा नायक आनंद पाटील यास 'मराठा' असण्याचाच दुरभिमान नाही तर पुरुषी अहंकारही त्याच्या नसानसात ठासून भरलाय. 'पुरुष' मंडळींची स्वतःच्या पत्नीबरोबरची सलगी त्याला अजिबात आवडत नाही. त्याच्या बायकोशी तिचा विद्यार्थी मनमोकळी चर्चा करतो ही गोष्टही त्याला रुचत नाही, कारण तो विद्यार्थी असला तरी 'पुरुष' आहे. दुसऱ्या बाजूला या विद्यार्थ्याचे वडील प्रतिष्ठित ग्रामस्थ असल्याने, त्यांची शिफारस फायद्याची ठरणार असल्याने तो स्वतःहून सलगी वाढवितो आणि आपल्या दुटप्पी वागणुकीची प्रचिती देतो.

वारंवार व्यावहारिक तडजोडी करीत, लबाडी करीत, लाचार होत भौतिक सुखं प्राप्त केली असली तरी या नवरा-बायकोचं मन बेचैन आहे. आतल्या आत एकप्रकारे उलघाल सुरू आहे. शिक्षणाने, आर्थिक सुबत्तेमुळे आपण 'आधुनिक' होत असलो तरीही दुसऱ्या बाजूला परंपरेने लादून ठेवलेल्या जात-पात, धर्म, लिंग या गोष्टींच्या सापळ्यातून आपणास सुटता आलेलं नाही. या सर्व गोष्टींना बळी पडून जगण्यात दाखवेगिरी, खोटेपणा, भंपकपणा यामुळे आपण नैसर्गिक

स्वत्व हरवत चाललो आहोत याची जाणीव होते. एक प्रकारची अपराधीपणाची ठुसठुस त्यांच्या मनाला कुरतडते आहे. अशा प्रकारच्या वास्तवापासून दूर पळून जाण्याचा मार्ग ते शोधत राहतात. स्वत:च्या अस्तित्वाला हरवून जाण्याचा एक पर्याय त्यांना सापडतो – तो म्हणजे 'मॉल'च्या झगमगाटात आणि पैसा खर्च करण्यासाठी आतुर झालेल्या बिनचेहऱ्याच्या ग्राहकांच्या गर्दीत स्वत:ला हरवून द्यायचं. मॉलमधल्या सरकत्या जिन्यावरून वरवर चढत राहून अधिक उंची गाठायची. यातच त्यांना मुक्ती दिसते. पण ही खरोखरची मुक्ती आहे की पुन्हा नव्या सापळ्यात अडकणं? एका सापळ्यातून सुटका करून घेण्यासाठी दुसऱ्या नव्या सापळ्यात जेरबंद होणं? आनंद पाटीलने नाटकाच्या शेवटास या नव्या सापळ्याचं सूतोवाच करून ठेवलं आहेच. त्याला स्वप्नातील हा मॉल आपल्या गावच्या शेतातल्या आंब्याच्या चार डेरेदार झाडांवर उभा करायचा आहे. हा मॉल कसा बांधायचा याविषयीची त्याच्या मनातील कल्पना सांगताना पुन्हा तो जातीच्या अहंकारानेच बरबटलेली भाषा बोलतो –

*'कसा बांधायचा? अगं सिम्पलय. कुलकर्णी–जोशी आर्किटेक्ट ॲण्ड कंपनीला बोलवू. ते त्यांचा मेंदू वापरतील. आतापर्यंत ते बांधावर उभं राहून सगळं डिझायनिंगचं काम करत आलेत. बांधणी करायला आमचेच लोक. उन्हातान्हात राबून रापून, घाम गाळायचं त्यांनीच करावं. मैदानात उतरून अंगावर माती घेणार तर तेच. अगं तो बघ अंतू हेगडे. आता तो धोतरात नाहीये, पँटीत आहे. आणि तो श्रीपा काळोजी बघ. किती छान हार्मोनियम वाजवायचा. घुमवायचा सूर. आता मॉलच्या एंट्रन्सवर वॉचमन म्हणून उभाय. आणि ती सोनाबाई गवंडी बघ. कसा पांढराशुभ्र टी शर्ट घालून आलीये. तुझ्या काकाच्या घरात भांडी घासायला यायची मागच्या दारात. घाम गाळतेय गं इथल्या एसीत स्वीपिंग करताना. परड्यातल्या कोनाड्यातला कप घेऊन मुकाटपणे उकिरड्याजवळ बसून चहा प्यायचा त्याचा मुलगा. बघ, अगं तो – तो चकचकीत लाल रंगाचा शर्ट घातलाय. फर्स्टक्लास ग्रॅज्युएट झालाय तो आणि ऐक की – फार छान गाणी म्हणतो तो – तो बघ कोल्ड्रिंगस्‌चे कॅन्स खांद्यावर घेऊन जातोय. ते बघ कार्समधून शॉपिंग करायला किती गर्दी झालीय – त्यांच्यासाठी गावाचा फील द्यायला हट रेस्टॉरंट पण बांधून झालंय...'*

एकंदरीत वर्गश्रेष्ठत्वातून आलेला अहंकारीपणा आणि काहीही झालं तरी तथाकथित प्रगतीच्या टप्प्यावर जातीमधील नव्या उतरंडीची गुंतागुंत टोकदारपणे व्यक्त होते.

माणसामाणसांतले तणाव कोणकोणत्या पातळ्यांवर पोहोचले आहेत याचा शोध घेण्याचा नेटका प्रयत्न 'आनंदभोग मॉल' या नाटकातून आशुतोषने केला आहे. मानवी जीवनातील व्यक्तीच्या वागण्याचं, अंतर्विरोधाचं, नाट्याचं आशुतोषला आकर्षण आहे. नवरा आणि बायको या दोन व्यक्तिरेखांच्या परस्परविरोधी वागण्यातील विलक्षण ताण कायम ठेवून मानवी वर्तनाचं खूपच छान चित्रण करण्यात तो कमालीचा यशस्वी झाला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील कसबा सांगावसारख्या छोट्याशा खेड्यातून लहानाचा मोठा झालेला आशुतोष आयुष्याच्या नंतरच्या टप्प्यात नोकरीच्या निमित्ताने इचलकरंजी, कोल्हापूर, बंगलोर अशा अनेक ठिकाणी फिरत राहिला. ग्रामीण, नागरी आणि महानगरी जीवनवास्तवाशी त्याचा अर्थातच प्रत्यक्ष संपर्क राहिला. त्यामुळे त्याला अनेक स्तरांवरील, वेगवेगळ्या भौगोलिक पर्यावरणातील भाषेचे पोत वापरणं सहज जमतं. त्याच्या लेखनातील प्रत्येक व्यक्तिरेखेला निश्चित वैशिष्ट्य आहे आणि ज्याचा त्याचा विक्षिप्तपणाही आहे. 'आनंदभोग मॉल' नाटकातील आनंद पाटील ही अस्सल 'कोल्हापुरी' व्यक्तिरेखा या दृष्टीने तपासून बघण्यासारखी आहे.

'आनंदभोग मॉल' हे नाटक आशय आणि आविष्कार या दोन्ही दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण असंच आहे. आजच्या आणि नजीकच्या काळातील नवा नाट्यानुभव कोणता आणि कशा प्रकारचा असू शकतो या गोष्टीकडे आपलं लक्ष वेधलं जातं. समोर येणारं वास्तव नाउमेद करणारं आहे. आपली इच्छा असो अथवा नसो, त्यापासून सुटका नाही. जागतिकीकरणामुळे 'जग एक खेडे' ही कल्पना पुढे येत असली तरी दुसऱ्या बाजूला व्यक्तीव्यक्तींमधला संवाद थांबला आहे. माणसाचं वस्तूत रूपांतर झालं. समाजकारण–सत्ताकारण यांचा चेहरामोहरा बदलला. हिंसा, दंगली, सत्ता, लालसा, चंगळवाद, धार्मिक वेडाचार, वंशद्वेष, बॉम्बस्फोट अशा गोष्टी परवलीच्या झाल्या. संपूर्ण कलाव्यवहार दहशतीखाली दबून चालला आहे. याबद्दल अस्वस्थ असणारे माझ्या पिढीतील अनेक जण आपआपल्या वकुबानुसार भवतालच्या बऱ्यावाईटपणाबद्दल प्रतिक्रिया देत आहेत. मात्र अशांची संख्या खूपच कमी आहे. ही गोष्ट आजच्या प्रगत समजल्या जाणाऱ्या समाजाशी सुसंगत नाही...

**– रफीक सूरज**
प्लॉट नं. ३८, शांतीनगर,
हुपरी, जि. कोल्हापूर – ४१६२०३.
Mob. 9422427501